। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक १२७ वा । शनिवार दिनांक २५ जुलै २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### धाराशिव पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत लक्ष्मण वय ४१ वर्षे, रा. तांदुळवाडी ता. वाशी ह.मु. गुमठाचा फड वाशी ता. वाशी जि. धाराशिव हे दि २२.०७.२०२६ रोजी वाशी शहरात गुमठाच्या फडात आपल्या राहत्या घराच्या पाठीमागे आडोश्याला अंदाजे ९,१२० किंमतीची ७६ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

कळंब पोलीस ठाण अंतर्गत पल्लवी वय १९ वर्षे, रा. डिकसळ ता. कळंब ह.मु. कल्पना नगर पारधी पिढी ता. कळंब जि. धाराशिव या दि २२.०७.२०२६ रोजी मार्केट यार्ड हिरो शोरुम लगत कळंब येथे अंदाजे ४,८०० किंमतीची ६० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

उमरगा पोलीस ठाणे अंतर्गत बब्रुवान रा. कवठा ता. उमरगा जि. धाराशिव हे दि २२.०७.२०२६ रोजी १४.०० वा. सु. आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे २,२०० किंमतीची २२ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर सुधाकर रा.चिंचोली ज. ता. उमरगा जि. धाराशिव हे दि २२.०७.२०२६ रोजी १९.०० वा. सु. चिंचोली ज. शिवारात डिग्गी जाणारे रोडच्या बाजूला अंदाजे ३,००० किंमतीची ३० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर संतोष वय ४५ वर्षे, रा. तुरोरी ता. उमरगा जि. धाराशिव हे दि २२.०७.२०२६ रोजी २०.०० वा. सु. झोपडपट्टी तुरोरी येथे अंदाजे १,६०० किंमतीची १६ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द उमरगा पो ठाणे येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदविले आहेत.

### नियमाचे उल्लंघन केल्याने गुन्हा दाखल

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पवन वय ३० वर्षे, रा.कुमशी ता. जि. बीड, मनोज वय २७ वर्षे, रा. रांजनी ता. गेवराई जि. बीड हे दि.२१.०७.२०२६ रोजी २२.३० ते दि. २२.०७.२०२६ रोजी सु. आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे मोटरसायकल ही वाशी हद्दीतील नॅशनल हायवे क्र ५२ रोडलगतव लोणखस शिवारात शिवशंती पेट्रोल पंपाजवळ नॅशनल हायवे मद्यधुंद अवस्थेत चालवून नियमाचे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी नमूद व्यक्तीविरुध्द वाशी पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहे.

## शिराढोण येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान संपन्न

# शिबिरासारखीच नागरिकांची कामे कार्यालयातूनही वेळेत व्हावीत- आ.कैलास पाटील-घाडगे

### * ३,५४५ लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ * शासकीय योजनांच्या माहितीचे स्टॉल नागरिकांसाठी आकर्षण



धाराशिव दि.२४ जुलै (जिमाका) सर्वसामान्य नागरिकांना विविध कामांसाठी शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार जावे लागू नये,त्यांच्या वेळेची व श्रमांची बचत व्हावी,यासाठी महसूल प्रशासनाने समाधान शिबिराचे आयोजन केले आहे.शिबिरात ज्या तत्परतेने कामे होत आहेत,त्याचप्रमाणे पुढील काळातही नागरिकांची कामे कार्यालयातून वेळेत झाली पाहिजेत,असे प्रतिपादन कळंब-धाराशिव विधानसभा मतदारसंघाचे आमदार कैलास पाटील-घाडगे यांनी केले.

२४ जुलै रोजी कळंब तालुक्यातील शिराढोण येथील ओमसाई मंगल कार्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी ज्योती पाटील,जिल्हा परिषद समाजकल्याण समितीचे सभापती श्री.कोकणे,कळंब पंचायत समिती सभापती राजश्री वरपे,धाराशिव पंचायत समितीच्या सभापती गोकर्णा कदम,उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे,जिल्हा परिषद सदस्या कांचन संगवे, पेकराज गाडगे,अजित लाकाळ, पंचायत समिती सदस्य मनोज घोगरे,दत्ता माकोडे,धाराशिव तहसीलदार डॉ.मृणाल जाधव, कळंबच्या अप्पर तहसीलदार प्राजक्ता पाटील तसेच शिराढोण सरपंच लक्ष्मीबाई म्हेत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आ.पाटील म्हणाले की,समाधान शिबिराच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत आहे.समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचल्या पाहिजेत.अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सकारात्मक मानसिकतेने सर्वसामान्य नागरिकांपर्यंत जाऊन सेवा दिली पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून जनतेसाठी काम करणे आवश्यक आहे.अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची प्रक्रिया सुरू असून,नागरिकांना छोट्या- छोट्या कामांसाठी वारंवार कार्यालयात येण्याची वेळ येऊ नये. प्रत्येकाने नियमित आरोग्य तपासणी करावी,विशेषतः महिलांनी आपल्या आरोग्याबाबत अधिक जागरूक राहावे,असेही त्यांनी सांगितले.

अप्पर जिल्हाधिकारी ज्योती पाटील म्हणाल्या,ग्रामीण भागातील नागरिकांनी समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.विविध योजनांचे लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याबरोबरच नागरिकांच्या समस्या मुळापासून सोडविण्याचा प्रयत्न प्रशासन करीत आहे. महसूलमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असून,यंत्रणांनी प्रभावी काम केल्यास त्याचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचतो.

कळंब पंचायत समितीच्या सभापती राजश्री वरपे यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर घ्यावा,असे आवाहन केले.

जिल्हा परिषद सदस्या कांचन संगवे म्हणाल्या की,अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना विविध योजनांचा लाभ मिळत आहे.महाआरोग्य शिबिराचा लाभ नागरिकांनी घ्यावा तसेच रेशनकार्डासंदर्भातील समस्या तहसील कार्यालयात सोडवून घ्याव्यात.

**३,५४५ लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ**

शिबिरात विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून एकूण ३,५४५ लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला.

महसूल विभागाच्या तहसील कार्यालय, कळंबमार्फत श्रावणबाळ/संजय गांधी निराधार योजनेचे ३६०,ईजीएस केवायसीचे ११५ आणि शैक्षणिक दाखल्यांचे ४७१ वितरण करण्यात आले. उपविभागीय अधिकारी कार्यालय, कळंब यांच्या माध्यमातून जात प्रमाणपत्र व नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्रांचे ५३६ लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले. पुरवठा विभागामार्फत ६५ शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले.नगर परिषद, कळंबमार्फत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ६ तर दीनदयाळ जनआजीविका योजना (शहरी) अंतर्गत २ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

पंचायत समिती कळंबमार्फत प्रधानमंत्री आवास योजनेचे ४५, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत शौचालय बांधकाम व वापर प्रोत्साहन निधीचे १२ लाभार्थी,तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत लखपती दीदी प्रमाणपत्रांचे ३७ वितरण आणि महिला स्वयंसहाय्यता गटांना सामुदायिक गुंतवणुकीचे ४ लाभ देण्यात आले.

तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे ५४ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

महिला व बाल विकास विभागामार्फत प्रधानमंत्री मातृवंदना योजना (२०), बालसंगोपन योजना (१२०), आधार कार्ड संलग्न सेवा (३०), एकल महिला योजना (१७), दिव्यांग योजना (१५) आणि बेबी केअर किट (२७१) लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले.भूमी अभिलेख विभागामार्फत सनद फीची ६ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

गट शिक्षण कार्यालय,पंचायत समिती कळंब यांच्या माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध योजनांचा लाभ देण्यात आला. त्यामध्ये दिव्यांग विद्यार्थी (४७८), समाजकल्याण शिष्यवृत्ती (६८), दिव्यांग विद्यार्थीनी प्रोत्साहन भत्ता (१३२), मदतनीस भत्ता (९१), प्रवास भत्ता (६८),लेखनिक/वाचनिक भत्ता (६),साहित्य साधने (२४), टीएलएम किट (१२), व्हीलचेअर (३),श्रवणयंत्र (६), क्रचेस (२), सीपी चेअर (१), लार्ज प्रिंट बुक (२२) आणि दिव्यांग प्रमाणपत्रे (१२५) देण्यात आली.

महावितरण उपविभागीय कार्यालयामार्फत डच-ठढ डलहशाश अंतर्गत २३३ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. पशुसंवर्धन विभागामार्फत दुधाळ गाई-म्हशींच्या गटांचे वाटप करण्यात आले.तहसील कार्यालय, धाराशिवमार्फत किसान विकास पत्रांचे २७, शिधापत्रिकांचे ५,शेळी गट वाटप ५,संजय गांधी/ श्रावणबाळ योजनेचे ३३ लाभार्थी आणि शैक्षणिक दाखल्यांचे १० वितरण करण्यात आले.

**गुणवंत विद्यार्थी व लाभार्थ्यांचा सत्कार**

शिबिरात NEET परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.हर्षराज माने,तन्मय वाघमारे,विश्वजित बांगर,कु.अश्लेषा लिमकर,अथर्व पवार,श्लोक हिरे यांचा यामध्ये समावेश होता.

याशिवाय आबासाहेब कापसे,बंडू आवाड, स्वप्नील नरसिंगे,अमोल शितोळे, प्रशांत शितोळे यांना जात प्रमाणपत्र,तर संजय बाळापुरे, लखन सहाणे,अमोल साठे, गोविंद वाघमारे,शंकर डांगे यांना उत्पन्न, डोमिसाईल व रहिवासी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.मिटू पांचाळ, अरबाज मुस्तफा शेख,कुशीद फकीर महंमद शेख,फकीर नजमोद्दीन शेख यांना २०११ पूर्वीच्या निवासी प्रयोजनातील अतिक्रमण नियमितीकरणासंदर्भातील लाभ देण्यात आला.

नगर परिषद,कळंबमार्फत दीनदयाळ जनआजीविका योजना (शहरी),प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) तसेच बेबी केअर किटचे वाटप करण्यात आले.रुद्रांश महिला बचत गटासह अंजली मंडाळे,शीतल माने,शोभा पामिरे,उषा मुंडे,अभिजित रणसिंगे,रोहिणी मस्के,महादेव मोरे, जलील लोहार,पूजा यादव,प्रगती पालकर, उजमा बेगम,स्वाती राठोड,सीमा परदेशी, शारदा गुंड आणि रविराज बोंदर यांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला.

पंचायत समिती कळंबमार्फत हम साथ है,सना,हमसाया,सुहाणा,जिजाऊ, अष्टविनायक,कुलस्वामिनी आणि संस्कृती महिला स्वयंसहाय्यता गटांना सामुदायिक गुंतवणूक निधी प्रदान करण्यात आला. तसेच लखपती दीदी योजना,प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण),वैयक्तिक शौचालय योजना,सामाजिक सहाय्यता योजना,शिधापत्रिका वाटप व जन्म-मृत्यू दाखल्यांचे वितरण करण्यात आले.

यामध्ये मोहन भानुदास बेळे,विलास पांडुरंग यादव,ज्ञानोबा तुकाराम सुटके,नूर महम्मद मियाजान शेख,सुधाकर शंकर कुंभार,गीता शामराव चव्हाण,सुमन बंडू यादव,शबेराबी दादागिरी शेख,भिमराव ज्ञानबा चव्हाण,अरुण कारभारी वाघमारे, निर्मला विष्णू नाईकवाडे,राणी जनार्दन किरते,पार्वती बिहुल यादव,दिलीप गोपाळ सहाणे,भारत माधवराव महाजन, श्याम मोहन सहाणे,रेहांत रफीक शेख, द्वारका नेताजी सहाणे,फरीन इसरार सय्यद,हसीना तांबोळी,रविराज प्रकाश व्यवहारे,इम्रान उमरखान पठाण,उमरखान उस्मानखान पठाण,सचिन विश्वनाथ गायकवाड आणि जुबेर मुख्तार शेख यांचा समावेश होता.

तहसील कार्यालय कळंब व धाराशिवमार्फत उत्पन्न प्रमाणपत्र, डोमिसाईल प्रमाणपत्र, जिवंत ७/१२ उतारा आदी सेवांचे वितरण करण्यात आले.

लाभार्थ्यांमध्ये गजेंद्र गोवर्धन जाधव, गुणवंत रघुनाथ सुतार, नागनाथ विश्वनाथ लांडे,किरणकुमार काकासाहेब आपटे, महादेव दगडू जराड,तनुजा बालाजी याकुरे,गोविंद राजाभाऊ सगर,शिल्पा अच्युत डांगे आणि नंदाबाई राजाराम डांगे यांचा समावेश होता.

विविध विभागांचे माहिती स्टॉल शिबिरात आरोग्य विभागाच्या महाआरोग्य शिबिरासह तालुका कृषी विभाग,पुरवठा विभाग,महिला व बाल विकास विभाग, सामाजिक वनीकरण विभाग,नैसर्गिक आपत्ती/ग्रीस्टॅक,उमेद अभियान,पंचायत विभाग,महसूल विभाग,संजय गांधी निराधार योजना,पोलीस विभाग,आधार सुविधा केंद्र,समाजकल्याण विभाग,सेतू सुविधा केंद्र,पशुसंवर्धन विभाग,रोजगार हमी योजना तसेच उद्योजकता व नाविन्यता विभागाचे माहिती स्टॉल उभारण्यात आले होते.संबंधित विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांना योजनांची माहिती देत माहितीपत्रके,घडीपुस्तिका, पॉकेट बुक आणि पुस्तिकांचे वितरण केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कळंब उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे यांनी केले.आभार धाराशिव तहसीलदार डॉ.मृणाल जाधव यांनी मानले.शिबिरास कळंब व धाराशिव तालुक्यातील विविध योजनांचे लाभार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पवनचक्की प्रकल्पातील तारा चोरी करणाऱ्या टोळीचा अखेर पर्दाफाश

### रतू खोखर यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई; ४ गुन्हे उघड



धाराशिव (शहा प्रतिनिधी शेख अंजुम)- जिल्ह्यातील पवनचक्की प्रकल्पांमधून सातत्याने होत असलेल्या वीजवाहिनी तारा चोरीच्या घटनांना अखेर स्थानिक गुन्हे शाखेने आळा घातला आहे. पोलीस अधीक्षक रितू खोखर यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत दोघांना अटक करण्यात आली असून, तब्बल चार चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. या कारवाईत १६ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील विविध पवनचक्की प्रकल्पांमधून वीजवाहिनीच्या तारा चोरीस जाण्याच्या घटनांमुळे प्रशासनासमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते. या गंभीर गुन्ह्यांची दखल घेत पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी स्थानिक गुन्हे शाखेला गुन्हेगार तातडीने शोध घेऊन कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते.

या आदेशानुसार २४ जुलै २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार व त्यांच्या पथकाने माहितीच्या आधारे बोरी पाटी पारधी पिढी (ता. वाशी) परिसरात सापळा रचला. या कारवाईत दोन संशयित आरोपींना महिंद्रा स्कॉर्पिओ आणि अशोक लेलँड दोस्त या वाहनांसह ताब्यात घेण्यात आले.

सखोल चौकशीत आरोपींनी आपल्या इतर साथीदारांसह आंबेवाडी, बरमगाव, लोहारा आणि कळदेव निबाळा परिसरातील पवनचक्की प्रकल्पांमधून वीजवाहिनीच्या तारा चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींकडून २९९ किलो वजनाच्या वीजवाहिनीच्या तारा, तसेच गुन्ह्यात वापरलेली दोन्ही वाहने असा एकूण १६.७० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना पुढील कायदेशीर कारवाईसाठी बेंबळी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

या यशस्वी कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार, पोलीस हवालदार शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, फरहान पठाण तसेच रत्नदीप डोंगरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

ही कारवाई जिल्हा पोलिसांच्या सतर्कतेचे आणि गुन्हेगारांविरुद्धच्या कठोर भूमिकेचे ठळक उदाहरण ठरत असून, पवनचक्की प्रकल्पांवरील चोरीच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे यश मानले जात आहे.

## स्कॉडा कार मधील रोख रक्कम चोरणारा आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने केले गजाआड

धाराशिव (प्रतिनिधी)- स्थानिक गुन्हे शाखा अंतर्गत फिर्यादी -नागराज सदानंद मडीवाळ, वय २९ वर्षे, रा. चिंचवाडा गाव पाली ता. बिचोली नॉर्थ जि. नॉर्थ गोवा यांचे स्कॉडा स्लाविया कार क्र जीए ०४ ई ९१५६ मध्ये पर्स मधील रोख रक्कम १,५०,००० व कागदपत्रे हे दि.१९.०७.२०२६ रोजी घाटशिळ पार्कींग येथे स्माशानभुमी रोडवर इदगाह जवळ तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने गाडीचा डाव्या बाजूचा काच फोडून चोरुन नेले होते. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-नागराज मडीवाळ यांनी दि.१९.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

सदर गुन्हा तपासादरम्यान पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विनोद इज्जपवार व पोलीस निरीक्षक मांजरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार अमोल निंबाळकर, राहुल नाईकवाडी, बळीराम शिंदे यांच्या पथकास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव येथील-मनोज महादेव धोत्रे, रा. वेताळ नगर तुळजापूर यास ताब्यात घेउन त्याचे कडे चौकशी केली असता त्यांनी सदरचे गुन्हे केल्याची कबुल करुन त्याने चोरी केलेला मुद्देमालापैकी काही मुद्देमाल पंचा समक्ष जप्त करण्यात आला. असुन सदरचा पंचनामा पोलीस ठाणे तुळजापूर येथील पोलीस उप निरीक्षक श्री थोटे यांनी केला. नमुद आरोपीस पोलीस ठाणे तुळजापूर येथे हजर केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## देशातील परिस्थितीचा जनतेनी विचार करावा. नसता.....

आपल्या देशात काय चालले आहे. कशी अचानक परिस्थिती निर्माण केली जात आहे. अचानक परदेशातून येवून आंदोलने कशी करीत आहेत. दररोज दोन हजार उपोषणकर्त्यास परदेशातून भोजन पुरविले जात आहे. परदेशिय मंडळी कसे मदत करीत आहेत ही बाब लपुन नाही. भोजन सप्लाय करणारे सांगतात दोन हजाराच्यावर भोजन पोंहचचत आहोत. परदेशातून ऑर्डर दिली जाते. त्याचे पेमेंट परदेशातून दिले जात आहे. देशात अशांतता माजविण्यासाठी, फंडींग पुरविली जात आहे ही बाब आता लपून राहीली नाही. सिनेअभिनेता नसरोद्दीन शहा यांना अशा वेळी जाग आली असून ते पंतप्रधानावर टिका करीत आहेत. पुर्वीही त्यांनी देशविरोधात वक्तव्य केले होते. वास्तविक देशाबद्दल प्रेम नसेल तर त्यांनी देश सोडून गेला पाहिजे. देशाविरोधात बोलायाचे व याच देशात म्हणजे भारतात अमाप धन कमवायाचे, प्रसिद्धी मिळवायाची व दुसरेकडे भारत मातेस नावे ठेवणारे ते एकमेव नाहीत अशी गँग भारतात कार्यरत आहे. देशात आंदोलने सुरू असतानाच ते जागे होतात, आपली पोळी भाजण्यासाठी सज्ज असतात, मुळात अशी मंडळीची शेजाऱ्या राष्ट्रावर मोठे प्रेम आहे हे अनेक बाबीवरून दिसून येते. त्यामुळे सध्याला ठरवुन कार्यक्रम सुरू आहे. नीट परिक्षापेपर फुटी प्रकरणी शिक्षण मंत्र्याचा थेट संबंध नसतो हे लक्षात घेतले पाहिजे, परिक्षापद्धती स्वतंत्र आहे. ती एक प्रक्रिया आहे. दिपके किंवा सोमन वांगचुक यांचा थेट याच्याशी काही ही संबंध नाही. परिक्षा एक प्रक्रिया आहे. वास्तविक देशातील काही विघ्नसंतोषी लोकांना जसे बांगला देशात व नेपाळमध्ये अशांतात निर्माण केली तसे युवकांना भडकावुन पंतप्रधानपदावरून मोदी यांना हटवायाचे आहे का? जे नेपाळ व बांगला देशात घडले ते भारतात घडवायाचे आहे की काय अशी शंका निर्माण होते आहे. दिपके यांचा असंख्य चहातावर्ग बांगलादेशी व पाकिस्तानी आहे. अनेक बाबी समजुन घेतल्या जात नाहीत. आता दिपके व वांगचुक यांना मिळणारा पाठींबा कमी झाला आहे. जनता जागृत झाली आहे. आंदोलनामागील उद्देश ओळखत आहेत. दोघे आंदोलनवादी उघडे पडत आहेत. या वेळी जो पोलिसाकडून बळाचा वापर झाला तो योग्य नाही मात्र तो का करावा लागला याबाबत विचार झाला पाहिजे. आंदोलन म्हणजे काय हे समजुन घेतले पाहिजे. याचा उपयोग जनतेसाठी होणे अपेक्षित आहे मात्र देशच अस्थिर करण्याचा हा डाव असू शकातो म्हणूप तो हाणून पाडला पाहिजे. देशातील अनेक संत, अभ्यासू, विचारवंत, समाजसेवक आदिमंडळी आहेत. असे असताना कोणीतरी उठावे व चुकीच्यामार्गाचा आवलंब करावा हे योग्य नाही. मुळात ज्याविषयी आंदोलन होत आहे त्याचा काही संबंध शिक्षणमंत्र्याशी असेल असे वाटत नाही. शिक्षणमंत्र्याच्या राजीनाम्याच्या आडून देश अस्थितर करण्याचा प्रयत्न होत असेल तर ते योग्य नाही. यात सुधारणा कशी करावी याचे मार्गदर्शन झाले पाहिजे. परिक्षा घेणे मुळात अग्निदिव्य आहे. नीटचा पेपर कोणी फोडला, कसा फोडला. यात समाविष्ठ करणारे कोण आहेत ते सध्या कोठे आहेत. याची माहिती देशातील नागरिकांना असताना यावर राजकारनातून देश अस्थितर करण्याचा मोठा डाव उघडा पडला आहे. जे नेपाळ व बांगला देशात तेच भारतात घडवायाचे आहे का? असेल तर जनता एवढी अविचारी भारतातील नाही हे पहिल्यांदा लक्षात घेतले पाहिजे. धमेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला तर ही समस्या सुटेल का? मुळात यात सर्वांनी मिळून सुधारणा करणे अपेक्षित आहे. गुन्हेगार आहेत. प्रत्यक्षात ज्यांचा समावेश आहे त्यांना शिक्षा अपेक्षित आहे. या बाबत कोणी बोलत नाही. काही मार्गदर्शन सुचना दिल्या जात नाहीत. आज पर्यंत जी शिक्षण पद्धती शिकविली जाते ती कोणती आहे. मेकाले शिक्षण पद्धतीचा आवलंब केला जातो आहे. भारतीय मुळ शिक्षण पद्धती कोणती आहे. आजची शिक्षण पद्धतीमुळे घरातला घरपना राहीला नाही. पाल्य हे आईवडीलांच्या पाया पडणे सोडा पायने लाथा मारत आहेत हीच का शिक्षण पद्धती? त्यामुळे आज जे देशात चालले आहे याकडे दुर्लक्ष करू नका. चुकीचे चालले आहे. देश अस्थिर करण्याचा डाव आहे. देशात आराजकता माजविण्याचे काम होताना दिसून येत आहे. देशात चुकीची मंडळी पुर्वीपासून कार्यरत आहेत, जी जेलमध्ये भ्रष्टाचाराच्यामार्ग आवलंबल्याने गेली आहे, जी देशद्रोही यांना मदत करणारी मंडळी आहे. अतिरेकी कारवायाचे समर्थन करणारी मंडळी आहे, ती कोण आहे हे आता जनतेनी ओळखले आहे. त्यामुळे ठराविक आम्ही नावे घेणार नाही त्या मंडळीचा सहभाग तथाकथीत आंदोलनात होताना दिसून येत आहे. आता चुकीचे मार्ग आवलंबणारे स्वार्थासाठी आंदोलन करीत असल्याने आंदोलावरील विश्वास आता उडाला आहे. चुकीच्या पद्धतीची मागणी होत आहे. मुळात आपल्यादेशात समसमानता असणे आवश्यक आहे. एकाला एक व दुसऱ्याला दुसरा नियम आहे हे योग्य नाही. चुकीची मंडळी जागी होवून देश कशा प्रकारे अस्थिर होईल याचा लाभ उठवित असतात. त्यामुळे भारतीय नागरिकांनो जागे व्हा! देशात काय चालले आहे. याचा विचार करा. परदेशातून येवुन चीनच्या आर्थिक मदतीवर आंदोलने होत असतील तर ते योग्य नाही. घातक अशी प्रवृत्ती निर्माण केली जात असेल तर ते योग्य नाही. यापुर्वी चांगले करता आली नाही, त्यांनी आता गप्प राहावे. देशात काही चांगले होत आहे. मुळात लोकशाहीसाठी पायीक मंडळी असणे स्वाभाविक आहे. देशात जो सरकार अस्थिरतेचा प्रयत्न चालू आहे तो शेवटचा प्रयोग असू शकतो. दिपके किंवा वांगचुक यांच्या खांद्यावर बंदुक ठेवुन चालविलेला प्रयत्न आहे. नीटचा पेपर फुटला, नंतर परिक्षा घेतली. त्याचा निकालही लागला. यातील चुकीची मंडळी जेलमध्ये आहे. सर्व काही तातडीने झाले असताना आता हा विषयी पुन्हा घेवुन देशात राजकिय आरजकता, अशांता माजविण्याचा केविलवाणी प्रयत्न योग्य वाटणार नाही. उपोषण जंतरमंतरवर व घुसखोरी लोकसभेत होताना दिसून आली आहे. त्यामुळे सर्वनियमबाह्य होताना दिसून येत आहे. त्यामुळे देशातील जी परिस्थिती दिसून येत आहे यावर देशातील जनतेनी विचार करावा. वेळीच सावध व्हावे. देशविरोधीमंडळीचा डाव ओळखावा. नसता आगामी काळात चुकीच्या मंडळीमुळे धोका होण्याची दाट शक्यता आहे. देशांतर्गत स्थिती अभ्यासली तर एक मोठे षडयंत्र आहे हे लक्षात येते. सावध व्हा नसता चुकीची मंडळीचा वावर वाढून संकट अटळ आहे.

# आषाढी वारी: भक्ती, शक्ती आणि समतेचा महासंगम

श्रीक्षेत्र पंढरपूरचा लोकदेव विठोबा हा गरिबांचा देव आहे. द्वारकेचा राणा तिकडचे ऐश्वर्य त्यानें सोडून दिलें आणि देव भावाचा लंपट । सांडून आलासे वैकुंठ ।।अशी नोंद पुराणात आहे. वारकरी पंथ हा अडाणी लोकांचा पंथ आहे, असा पुष्कळांचा समज आहे; पण त्यांत तिळमात्र तथ्य नाहीं. भोळीभाबडी भक्ति हाच त्या पंथाचा आधार असल्यामुळे हजारों लोक गेली शेकडो वर्षे दरवर्षी आषाढी –कार्तिकी वारीच्या निमित्ताने त्यांत सामील होत असतात. वारकरी पंथांत विठ्ठलभक्तीचा महिमा विशेष आहे. निवृत्तिनाथ ते निळोबा अशी वारकरी परंपरा आहे. या पंथानें विद्वत्तेचें अवडंबर माजविलें नाहीं हे खरें; परंतु त्यानें अंधभक्तीलाहि कोठेंच थारा दिलेला नाहीं. वात्सल्य, दयाशीलता, सहिष्णुता, क्षमाशीलता इत्यादि गुणांनीं तो संपन्न आहे. विठाई ही खरी अनाथांची माउली आहे. म्हणूनच तिच्याशी प्रेमानें सलगी करतांना भक्तांना कधीं संकोच किंवा भीति वाटत नाहीं. ''ज्ञानदेव तु कैवल्यम्' हे वेदान्ताचें मुख्य सूत्र त्यानें कधींहि सोडलें नाहीं. नामसंकीर्तनासारख्या सहजसुलभ साधनाचा त्यानें उदोउदो केला; पण साधनाच्या दृष्टीनें ही केवळ पहिली पायरी आहे हें त्यानें वारंवार व निक्षून सांगितलें आहे.

वारकरी संप्रदाय अद्वैती असल्यामुळे अद्वैत तत्त्वज्ञानाचे निरूपण असलेले सर्व ग्रंथ वारकऱ्यांना शिरोधार्य आहेत. त्यातही गीता आणि भागवत हे दोन्ही ग्रंथ वारकऱ्यांच्या नित्य पठणात असतात. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत इत्यादी श्रेष्ठ ग्रंथ वारकऱ्यांना पवित्र आहेत. 'गीता भागवत करिती श्रवण। अखंड चिंतन विठोबाचे ।।' अशी वारकऱ्याची महत्त्वाची खूण तुकाराम महाराजांनी सांगितली आहे. त्याशिवाय ज्ञानेश्वरी व ज्ञानेश्वरांचे अन्य सर्व ग्रंथ, नामदेव महाराजांची अभंग गाभा, एकनाथ महाराजांचे एकनाथी भागवत म्हणजेच भागवताच्या एकादश स्कंदावरील टीका, तुकाराम महाराजांची अलौकिक गाथा, नाथांचेच भावार्थ रामायण आणि या सर्वांच्या जोडीला वारकरी संप्रदायाच्या सर्व संतांची अभंग रचना वारकऱ्याला प्रमाण आहे. त्या सर्व संतांची अभंगसंपदा सर्व वारकऱ्यांना अत्यंत प्रिय आहे.

आपल्या ग्रंथातून सर्व संतांनी अद्वैत तत्त्वज्ञानच सांगितले आहे. ज्ञानेश्वरी आणि तुकोबांची गाथा ही वारकऱ्यांना सर्वाधिक प्रिय म्हणावी लागतील. त्याखालोखाल नाथांचे भागवत येते. यांच्या तुलनेत नामदेव महाराजांची अभंगसंपदा मात्र काहीशी उपेक्षित राहिली. नामदेवांच्या बाबतीत झालेली उपेक्षा दुसऱ्या भक्तिखंडात विशेष करून प्रस्तावनेत आली आहे. परंतु सर्व संतांचे अभंग वारकऱ्यांना प्रिय असतात

वारकरी पंथ हा सर्वसंग्राहक आहे. त्यानें संकुचित सांप्रदायिकता बाळगली नाहीं, प्रतीकाचा दुराग्रह धरला नाहीं, दैवतावर रणें माजविली नाहींत. परमेश्वर सर्वव्यापी आहे व तो विविध रूपांनी नटलेला आहे; तुका म्हणे हरि। अवघा एकला ।। परी हा धाकुला। भक्तीसाठीं ।। म्हणून उपासकांची भावनाच मुख्य आहे, प्रतिमा गौण आहे, याची जाणीव त्यांना होती. त्यामुळे राम, कृष्ण, दत्त, शिव इत्यादि दैवतांच्या भक्तांना त्यांनी आपल्यांत सामावून घेतले. वारकरी संतांनी तर नेहमींच विष्णु व शिव यांच्या ऐक्यावर भर दिला आहे. शिव मस्तकी धरिला। भेद मक्तांचा काढिला ।। लक्षावधी शूद्राशूद्राना या दयामय दैवतानें आत्मोद्धाराची प्रेरणा दिली आहे, बंधुभावाचे पाठ दिले आहेत. मात्र संतांच्या मताप्रमाणे 'विठोबा हा वारकऱ्यांच्या दृष्टीने राम, कृष्ण व विठ्ठल हे तिथेहि एकाच परमेश्वराचे अवतार आहेत.

लोकांत श्रद्धा होतीच, तिला संतांनी डोळसपणा आणला. बहुजनसमाजाच्या आत्मिक उन्नतीसाठीं त्यांनी वारकरी पंथाला नवें वळण लावलें. संत ज्ञानेश्वर हे वास्तववादी धर्मसुधारक होते. महाराष्ट्रातील सर्वच संतांनी अध्यात्मविद्या ही आतां केवळ दशग्रंथी ब्राह्मणांची मिरास राहिली नाहीं. वारकरी पंथानें संतांनीच निर्माण केलेल्या ग्रंथसाहित्यातून लोकांतून धर्मप्रवक्ते तयार केले. आम्हां 'कीर्तन' कुळ धाडी अश्या भावनेनें ते आपला जन्मसिद्ध हक्क गाजवू लागले. संत ज्ञानेश्वरांच्या भावार्थ दीपिकेनें या लोकांना कवित्वाची प्रेरणा, तशीच कीर्तनाची स्फूर्ति दिली. वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा। येरांनी वाहावा भार माथां ! असें आव्हानपूर्वक म्हणण्याइतका आत्मविश्वास संत तुकारामांसारख्या कुणब्याने सर्वदूर महाराष्ट्रात विविध ठिकाणी उत्पन्न झाला.

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा संप्रदाय असल्यामुळे पंढरीच्या वारीसाठी सर्व महाराष्ट्रातून अनेक दिंड्या व फड वर्षानुवर्षे भुवैकुंठात दाखल होतात. त्यात आळंदीहून निघणारी ज्ञानोबांची दिंडी सर्वात प्रभावी आहे. आळंदीहून येणारी ही दिंडी हैबतबाबांची असून वारीची सात्त्विक परंपरा दृढमूल करण्याचे श्रेय आधुनिक काळात हैबतबाबांनाच आहे. त्र्यंबकेश्वर (निवृत्तिनाथ), सासवड (सोपानकाका), एदलाबाद (मुक्ताई), पैठण (एकनाथ महाराज), देहू (तुकाराम महाराज) या मोठ्या दिंड्याही वारीसाठी पंढरीत येतात. त्याशिवाय अरणभेंडीहून सांवता महाराज, मंगळवेढ्याहून चोखोबा महाराज, तेरढोकीहून गोरोबाकाका, लऊळहून कुर्मदास महाराज यांच्या दिंड्याही पंढरीत उत्सवासाठी अक्षय परंपरेने येतात. नेवाशाहूनही दिंडी पंढरीत येते. वारकरी संप्रदायाची सात्त्विक परंपरा प्रामुख्याने महाराष्ट्रातील नामवंत फडांनी टिकविली आहे. वारकऱ्याचा आचार पाळणारे आणि पंढरीशाला भजणारे वारकरी महाराष्ट्रात लक्षावधी आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ते पसरले आहेत. अनेक गावात, शहरात हजारो वर्षे हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून लोकांचे प्रबोधन करीत आहेत. लाखोंची वारी किंवा होणारे नामसंकीर्तन हे न चुकता सर्व शिस्तीने घडते आहे. याचे सर्व श्रेय संतांच्या ग्रंथसंपदेला आणि निरूपणाच्या माध्यमातून मशागत करण्याऱ्या लाखोंच्या भक्तांना जाते. त्यातही या संप्रदायात खोलवर रुजलेली फड परंपरेनी महत्वाची कामगिरी केली आहे.

त्या त्या स्थळी असलेल्या वारकरी प्रमुख आणि त्यांच्या शिष्य मंडळींचा एकत्रित, संघटित, शिस्तबद्ध आणि सदाचारी समुदाय म्हणजे फड म्हणता येईल. पंढरीच्या वारीची शिस्त आणि कीर्तनभक्ती व नामस्मरण यांची अक्षुण्ण परंपरा या फडांमुळे अधिकच समृद्ध झाली आहे. स्वकर्म आचरल्यानंतर दिवसातील काही वेळ मुद्रा, भजन, कीर्तन, पाठांतर, मंत्रजप यासाठी प्रत्येक वारकऱ्याने द्यावयाचा असतो. वारकरी संप्रदाय हा खऱ्या अर्थाने सात्त्विक पंथ आहे. या संप्रदायाचे अनुयायी प्रामुख्याने बहुजन समाजातील असून गरीब कुटुंबातील असतात. परंतु त्यांची नीतिमत्ता, आदर्श, सदाचारी वर्तणूक बहुसंख्य वारकऱ्यांच्या कर्तव्यातून आणि कर्मातून सहजपणे प्रगट होत असते. पंढरी आणि देहू आळंदीच्या वाटेवर असताना वारकऱ्यांची ही सदाचारता निःसंशय प्रत्ययाला येते.



– रवींद्र मालुसरे
अध्यक्ष,मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई
९३२३११७७०४

## क्विक हील फाउंडेशन आणि राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने Cyber Shiksha for Cyber Suraksha अभियानांतर्गत जनजागृती घेराव!




**लातूर/प्रतिनिधी :** क्विक हील फाउंडेशन आणि राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या Cyber Shiksha for Cyber Suraksha या उपक्रमांतर्गत सदानंद प्राथमिक विद्यालय, लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

या सत्रात सायबर वॉरियर्स तुषार वाघमारे आणि आदित्य माने यांनी विद्यार्थ्यांना इंटरनेटचा सुरक्षित वापर, मजबूत पासवर्ड तयार करण्याचे महत्त्व, ऑनलाइन गेमिंगमधील धोके, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, फिशिंग, जढझ फसवणूक आणि सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याविषयी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी सत्रात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न विचारले. संवादात्मक पद्धतीने घेण्यात आलेल्या या सत्रामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण झाली.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना डिजिटल जगात सुरक्षित, जबाबदार आणि सजग नागरिक बनविणे हा असून, लातूर शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये अशी जनजागृती सत्रे पुढील काळातही आयोजित करण्यात येणार आहेत.

## Gen Z मुलींमध्ये मधुमेहाचा वाढता धोका; १० वर्षांत तब्बल ७० टक्क्यांनी वाढले रुग्ण



आजच्या तरुण पिढीमध्ये म्हणजेच ञ्चाप न मध्ये मधुमेहाचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याचे एका नव्या संशोधनातून समोर आले आहे. विशेष म्हणजे २० ते २९ वर्षे वयोगटातील तरुणींमध्ये टाइप-२ मधुमेहाच्या नव्या रुग्णांमध्ये गेल्या दहा वर्षांत जवळपास ७० टक्क्यांनी वाढ झाली आहे. या वाढीमागे वाढता लठ्ठपणा हे प्रमुख कारण असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

द लॅन्सेट रिजनल हेल्थ या वैद्यकीय नियतकालिकात प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, १९९७ ते २०१२ या कालावधीत जन्मलेल्या म्हणजेच Gen Z पिढीमध्ये टाइप-२ मधुमेहाचे प्रमाण चिंताजनकरित्या वाढत आहे. २०२६ मध्ये या पिढीचे वय साधारणपणे १४ ते २९ वर्षांच्या दरम्यान आहे. पूर्वी हा आजार प्रामुख्याने ५० ते ६० वर्षांनंतर दिसून येत होता. मात्र आता कमी वयातच मधुमेहाचे निदान होण्याचे प्रमाण वाढले आहे.

तज्ज्ञांच्या मते, कमी वयात होणारा टाइप-२ मधुमेह अधिक धोकादायक ठरू शकतो. कारण हा आजार अनेक वर्षे शरीरावर परिणाम करत राहतो. त्यामुळे पुढे हृदयविकार, स्ट्रोक, डोळ्यांची दृष्टी कमी होणे, मूत्रपिंड निकामी होणे आणि इतर गंभीर गुंतागुंत होण्याचा धोका वाढतो.

या संशोधनात इंग्लंडमधील २०११ ते २०२४ या कालावधीतील टाइप-२ मधुमेहाच्या रुग्णांच्या नोंदींचा अभ्यास करण्यात आला. त्यामध्ये २० ते २९ वर्षे वयोगटातील महिलांमध्ये दर एक लाख महिलांमागे नवीन रुग्णांची संख्या २६ वरून ४४ पर्यंत वाढल्याचे दिसून आले. म्हणजेच जवळपास ६९ ते ७० टक्क्यांची वाढ नोंदवली गेली. याच वयोगटातील पुरुषांमध्येही वाढ झाली, मात्र ती सुमारे ४३ टक्के इतकी होती.

संशोधनानुसार, या वाढीमागचे सर्वात मोठे कारण म्हणजे वाढलेला बॉडी मास इंडेक्स (BMI). बीएमआय हा व्यक्तीच्या उंची आणि वजनावर आधारित मापदंड असून, त्यावरून व्यक्तीचे वजन सामान्य आहे की जास्त, हे ठरवले जाते. १८.५ ते २४.९ हा बीएमआय सामान्य मानला जातो. २५ ते २९.९ म्हणजे जादा वजन, ३० पेक्षा अधिक म्हणजे लठ्ठपणा, तर ४० किंवा त्यापेक्षा जास्त बीएमआय गंभीर लठ्ठपणाचे लक्षण मानले जाते.

अभ्यासात सहभागी झालेल्या २० ते २९ वर्षे वयोगटातील मधुमेही महिलांचा सरासरी बीएमआय ३७.७ वरून ४०.७ पर्यंत वाढल्याचे दिसून आले. म्हणजेच अनेक तरुणी गंभीर लठ्ठपणाच्या श्रेणीत पोहोचल्या आहेत. त्यामुळे मधुमेहाचा धोका अधिक वाढत असल्याचे संशोधकांनी सांगितले.

तज्ज्ञांच्या मते, कमी वयात वाढणारा लठ्ठपणा रोखण्यासाठी आहार आणि जीवनशैलीत बदल करणे अत्यंत गरजेचे आहे. जंक फूड, साखरयुक्त पेये, शारीरिक हालचालींचा अभाव आणि बैठी जीवनशैली यामुळे वजन झपाट्याने वाढत आहे. यावर वेळीच नियंत्रण न ठेवल्यास मधुमेहासह अनेक गंभीर आजारांचा धोका वाढू शकतो.

तज्ज्ञांचा सल्ला असा आहे की, लहान वयापासूनच संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि वजन नियंत्रणावर भर दिल्यास टाइप-२ मधुमेहाचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येऊ शकतो.

## त्वचेवर दिसतायत 'ही' लक्षणं? दुर्लक्ष करू नका; लिव्हरच्या आजाराचा असू शकतो इशारा

लिव्हर हा आपल्या शरीरातील अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकणे, अन्नाचे पचन होण्यास मदत करणे, पोषक घटकांचे योग्य प्रकारे प्रक्रिया करणे अशा अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या लिव्हर पार पाडतो. मात्र, चुकीची जीवनशैली, तेलकट आणि प्रक्रिया केलेले अन्न, लठ्ठपणा, मद्यपान, फॅटी लिव्हर आणि काही विषाणूजन्य संसर्ग यांमुळे लिव्हरच्या आजारांचे प्रमाण वाढत आहे. विशेष म्हणजे, सुरुवातीच्या टप्प्यात लिव्हरच्या आजारांची ठळक लक्षणे दिसत नाहीत. अशा वेळी त्वचेवर दिसणारे काही बदल हे लिव्हर बिघडल्याचे सुरुवातीचे संकेत असू शकतात.

### त्वचा आणि डोळे पिवळे पडणे

लिव्हर नीट काम करत नसल्यास शरीरात बिलीरुबिन नावाचे द्रव्य वाढू लागते. त्यामुळे त्वचा आणि डोळ्यांचा पांढरा भाग पिवळसर दिसू लागतो. याला कावीळ म्हणतात. हे लिव्हरच्या आजाराचे एक महत्त्वाचे लक्षण असू शकते. अशी लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

### सतत खाज येणे

कोणतेही स्पष्ट कारण नसताना शरीराला सतत खाज येत असेल, तर तेही लिव्हरच्या समस्येचे लक्षण असू शकते. ही खाज शरीराच्या एखाद्या भागात किंवा संपूर्ण शरीरावर जाणवू शकते. अनेक दिवस हा त्रास कायम राहिल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये.

### सहज निळे किंवा काळे डाग पडणे

लिव्हर रक्त गोठवण्यासाठी आवश्यक असलेली काही प्रथिने तयार करण्यात मदत करतो. लिव्हर नीट काम करत नसल्यास अगदी किरकोळ दुखापतीनंतरही त्वचेवर निळे किंवा काळे डाग सहज पडू शकतात. असे वारंवार होत असेल, तर तपासणी करणे गरजेचे आहे.

### त्वचेवर लाल डाग

काही लिव्हरच्या आजारांमध्ये त्वचेवर लहान लाल रंगाचे डाग दिसू शकतात. हे डाग कोळ्याच्या जाळ्यासारखे दिसत असल्यामुळे त्यांना स्पायडर अँजिओमा असे म्हणतात. हे डाग प्रामुख्याने चेहरा, मान, छाती किंवा खांद्याजवळ दिसतात. असे बदल दिसल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

(क्रमशः कालच्या अंकावरुन)...

## तुळशीची माळ परिधान केल्याने होणारे फायदे

ही माळ धारण केल्याने शरीर शुद्ध होते, चैतन्य वाढते. पचनशक्ती, ताप, सर्दी, डोकेदुखी, त्वचा संक्रमण, मेंदूचे आजार, वायू अशा अनेक आजारांमध्ये व्यक्तीला आराम मिळतो. तसेच संसर्गामुळे होणाऱ्या आजारांपासूनही संरक्षण मिळते. तुळस हे एक अद्भुत औषध आहे, ते रक्तदाब आणि पचन सुधारते. तुळशी धारण केल्याने शरीरात विद्युत प्रवाह वाढतो. गळ्यात तुळशीची माळ घातल्याने विद्युत लहरी बाहेर पडतात, ज्यामुळे रक्ताभिसरणात अडथळा निर्माण होत नाही. याशिवाय मलेरिया आणि अनेक प्रकारच्या तापामध्ये तुळस खूप फायदेशीर आहे. ते गळ्यात घातल्याने अत्यावश्यक क्युप्रेशर पॉइंट्सवर दबाव येतो, जो मानसिक तणावात फायदेशीर ठरतो. तसेच स्मरणशक्ती वाढण्यास मदत होते काविळीमध्ये तुळशीची माळ धारण करणे आरोग्यासाठी चांगले मानले जाते. तुळशीचे लाकूड पांढऱ्या सुती धाग्यात घातल्यास कावीळ रोग लवकर संपतो, असे म्हणतात. तुळशीची माळ परिधान केल्याने होणारे फायदे

**१. उच्चकोटीचा आध्यात्मिक संबंध:**
तुळशीची माळ धारण केल्याने एखाद्याचा आध्यात्मिक संबंध वाढतो असे मानले जाते. तुळशीला हिंदू धर्मात पवित्र मानले जाते आणि बहुतेकदा भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मी यांसारख्या देवतांशी संबंधित आहे. ध्यान किंवा प्रार्थनेदरम्यान तुळशीच्या मण्यांशी सतत संपर्क साधल्याने आध्यात्मिक अनुभव अधिक गहन होतात आणि आंतरिक शांतीची भावना वाढते.

**२. नकारात्मक ऊर्जेपासून संरक्षण:**
तुळशी शुद्धीकरण गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहे. तुळशीची माळ धारण केल्याने नकारात्मक ऊर्जा आणि प्रभावांपासून संरक्षणात्मक कवच तयार होते. हे कवच वाईट शक्तींना दूर ठेवते आणि परिधान करणाऱ्यांच्या जीवनात सकारात्मकता आणते.

**३. मानसिक स्पष्टता आणि फोकस:**
तुळशीचा सुवासिक सुगंध वैचारिक स्पष्टता वाढवतो. यामुळे तुळशीची माळ धारण करणे मानसिक लक्ष सुधारण्यासाठी फायदेशीर ठरते. अनेक अभ्यासकांना असे आढळते की ध्यान करताना तुळशीचे मणी धारण केल्याने मन शांत होते आणि एकाग्रता वाढते.

**४. तणावमुक्ती:** तुळशीला डाप्टोजेन म्हणून ओळखले जाते, याचा अर्थ ते शरीराला तणावाशी जुळवून घेण्यास आणि संतुलन राखण्यास मदत करते. तुळशीची माळ धारण केल्याने तणावाची पातळी कमी होण्यास आणि विश्रांतीस प्रोत्साहन मिळण्यास मदत होते, त्यामुळे सर्वांगीण कल्याण होण्यास हातभार लागतो.

**५. रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे:**
तुळशीशी नियमित संपर्क केल्यास रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते असे मानले जाते. तुळशीची माळ धारण केल्याने शरीराला संक्रमण आणि आजारांपासून अधिक प्रभावीपणे लढण्यास मदत होऊ शकते, त्याच्या प्रतिजैविक आणि इम्युनोमोड्युलेटरी गुणधर्मांमुळे.

**६. श्वसन आरोग्य:**
तुळशीचा वापर आयुर्वेदात श्वसनाच्या आजारांसाठी पारंपारिकपणे केला जातो. त्वचेच्या जवळ तुळशीची माळ धारण केल्याने खोकला, सर्दी आणि दमा यांसारख्या श्वासोच्छवासाच्या समस्या दूर होतात असे मानले जाते, कारण त्याच्या कफ पाडणारे औषध आणि ब्रोन्कोडायलेटर प्रभाव आहे.

**७. त्वचेची काळजी:**
तुळशीमध्ये अँटिऑक्सिडंट्स भरपूर असतात आणि त्यात दाहक-विरोधी गुणधर्म असतात, ज्यामुळे ते त्वचेच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. तुळशीची माळ धारण केल्याने मुरुम, डाग आणि त्वचेच्या इतर समस्या कमी होण्यास मदत होऊ शकते, ज्यामुळे रंग स्वच्छ आणि निरोगी होतो.

# तुम्हाला गुलाबाचे फायदे माहिती आहेत का?

गुलाब. हे फूल कोणाला आवडत नाही, असे कोणीच नाही. गुलाबाचे फूल हे सर्वांनाच आवडते. विशेष म्हणजे गुलाचे फूल ही प्रेमाची निशाणी म्हणून ओळखले जाते. विविध रंगांची गुलाबाची फुले पाहिली का मन अगदी प्रसन्न होते. गुलाबाचे फूल आणि त्याचा सुगंध सर्वांनाच आवडतो. गुलाबाला फुलांचा राजा असेही म्हणतात. गुलाबाचे फूल जितके दिसायला सुंदर आहे तितके त्याचे फायदे देखील खूप आहेत. गुलाबाच्या पाकळ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात औषधी गुणधर्म आहेत. त्यामुळे अनेक आरोग्याशी संबंधित अनेक समस्यांवर गुलाब एक उत्तम औषध म्हणून कार्य करते. गुलाबाकडे पाहिल्याने तणाव दूर होतो. त्याचप्रमाणे गुलाबाचा प्रभाव थंड असतो त्यामुळे उन्हाळ्यात त्याचे सेवन करणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त गुलाबाचे अजून कोणते फायदे आहेत. जाणून घेऊया.

वजन कमी करण्यास उपयुक्त
गुलाबाच्या पाकळ्यांमध्ये आढळणारे घटक शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास तसेच चयापचय वाढविण्यास मदत करतात. त्यामुळे लठ्ठपणा कमी होतो. जर माणसाला वारंवार भूक लागत असेल तर गुलाबाच्या पाकळ्या खाल्ल्याने भूक नियंत्रणात राहते. यामुळे वजनही नियंत्रणात राहते. त्यामुळे गुलाबाच्या पाकळ्यांचे सेवन करणे फायदेशीर आहे. मूळव्याधावर फायदेशीर ज्या लोकांना मूळव्याध म्हणजेच मूळव्याधचा त्रास आहे, त्यांनी गुलाबाच्या पाकळ्यांचे सेवन करावे. यामध्ये असलेले फायबर आणि पाणी शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत होते आणि पचन सुधारते. मूळव्याध दरम्यान रक्तस्राव आणि वेदना या समस्या देखील दूर होतात.

हाडे होतात मजबूत
गुलाबामध्ये व्हिटॅमिन-सी आणि अँटीऑक्सिडंट्स चांगल्या प्रमाणात आढळतात. जे हाडे मजबूत करण्यास मदत करतात. यासाठी तुम्ही गुलाबाच्या पाकळ्यांपासून बनवलेल्या गुलकंदच्या स्वरूपातही गुलाबाचे सेवन करू शकता.

लैंगिक उत्तेजना वाढवण्यासाठी फायदेशीर
कुणी प्रेम व्यक्त करताना गुलाबपुष्प देऊनच करतो हे अनेकदा आपण पाहिले आहे. एवढेच नाही तर गुलाब माणसाला लैंगिकदृष्ट्या सक्रिय बनवते. यामुळे मूड सुधारतो. रोमान्सची मजा दुप्पट होते. त्यामुळे लैंगिक उत्तेजना वाढवण्यासाठी गुलाब फायदेशीर ठरते.

तणाव दूर करण्यास होते मदत जर एखाद्या व्यक्तीला थकवा, नैराश्य आणि तणावामुळे झोपेचा त्रास होत असेल तर आपल्या पलंगावर काही गुलाब ठेवा. गुलाबाच्या सुगंधानेही मन शांत होते आणि तणाव दूर होण्यास मदत होते.



# बर्नहॅम यांची कसोटी

इंग्लंडमधील सरकारला -ते कोणत्याही पक्षाचे असले तरी -जनतेच्या मताची कदर करावी लागते. तेथील लोकशाही पक्क आहे हे त्यातून दिसते. जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणे हीच बर्नहॅम यांची खरी कसोटी आहे.



पोट निवडणूक जिंकून अँडी बर्नहॅम हाउस ऑफ कॉमन्स मध्ये प्रवेशले तेव्हाच इंग्लंडचे भावी पंतप्रधान असे त्यांना संबोधले जाऊ लागले होते. आता ते अधिकृतपणे इंग्लंडचे पंतप्रधान बनले आहेत. कठीण काळात त्यांच्याकडे हे पद आले आहे. गेल्या चार वर्षांत इंग्लंडने पाच पंतप्रधान पाहिले या वरूनच तेथील राजकीय आणि सामाजिक स्थिती किती अस्थिर आहे याची कल्पना येते. ग्रेट ब्रिटन किंवा युनायटेड किंग्डम या नावाने ओळखला जाणारा हा देश जगातील पाचवी अर्थव्यवस्था मानला जातो. मात्र सरकारी तिजोरीवरील ताणामुळे तेथील जनतेत रोष आहे. करमुक्त वैयक्तिक भत्त्याची मर्यादा वाढवण्याचे त्यांनी आधी सूचित केले होत; पण त्याची अंमलबजावणी त्यांनी टाळली आहे. काही गटांना खुष करण्यासाठी तेथे मोफतच्या योजना राबवल्या जात नाहीत कारण सरकारी खर्चावर जनतेचेही लक्ष असते याचे हे द्योतक आहे. तेथील महागाईवाढीचा दर २.६ टक्क्यांवर आला आहे. अपेक्षेपेक्षा ही घट जास्त आहे. तरी गेली दोन-तीन वर्षे रोजच्या जगण्याचा खर्च वाढल्याची तक्रार इंग्रज नागरिक करत आहेत. त्यावर उतारा म्हणून बस भाड्यावर बर्नहॅम यांनी मर्यादा घातली आहे. वीज व गॅसच्या बिलांवरील कर कमी केला आहे. दीर्घकाळासाठी अर्थव्यवस्थेला उभारी देण्यासाठी ते काय करतात हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

तारेवरची कसरत
दोन वर्षांपूर्वी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत केर स्टार्मर यांच्या नेतृत्वाखाली मजूर (लेबर) पक्षाने ४११ जागा जिंकून जबरदस्त विजय मिळवला. हुजुर पक्षाच्या (कंझर्वेटिव) धोरणांना विरोध करण्यासाठी हे 'नकारात्मक' मतदान होते असेही तेव्हा बोलले गेले. केर स्टार्मर अपेक्षेनुसार पंतप्रधान झाले; पण अमेरिकेत राजदूतपदी नेमलेली व्यक्ती जेफ्री एपस्टाईनशी संबंधित असल्याचे उघड झाले. त्या व्यक्तीची पूर्ण पडताळणी न करता त्याची नेमणूक केल्याचा ठपका स्टार्मर यांच्यावर ठेवला गेला. त्यातून पक्षात असंतोष वाढला आणि अखेर स्टार्मर यांना पद सोडणे भाग पडले. विकसित लोकशाहीचे हे लक्षण आहे. प्रचंड बहुमताच्या आधारे सत्ता मिळवून दिली तरीही पक्षाने स्टार्मर यांना माफ केले नाही. सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतात मंत्र्यांवर गंभीर आरोप झाले तरी त्याला पद सोडण्यास फार कमी वेळा सांगितले जाते. बर्नहॅम यांच्यावर पक्ष व जनतेच्या अपेक्षांचे ओझे आहे.पश्चिम आशिया व युक्रेनच्या युद्धामुळे संरक्षणावरील खर्च वाढवणे इंग्लंडला भाग आहे. तो वाढत नसल्याचे कारण देत जॉन हीली यांनी स्टार्मर सरकारमधून संरक्षण मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्याकडेच बर्नहॅम यांनी अर्थखाते सोपवले आहे. पैसे कोठून व कसे उभे करायचे हा प्रश्न बर्नहॅम यांच्या समोर आहे. तेथील शिक्षण क्षेत्र, विशेषत: विद्यापीठांसमोरही आर्थिक पेच उभा आहे. इतकी वर्षे परदेशी विद्यार्थ्यांमुळे त्यांना पैसा मिळत होता; पण अलिकडे इंग्लंडने व्हिसा वरील नियंत्रणे कठोर केल्याने परदेशी विद्यार्थ्यांची संख्या जवळपास ३१टक्क्यांनी घटली आहे. आर्थिक ताणामुळे शैक्षणिक संस्थांमधील अध्यापक /प्राध्यापकांच्या नोकर्यांवरही गदा आली आहे. इंग्रजी विद्यापीठांचे जागतिक स्थान त्यामुळे धोक्यात आले आहे. स्थलांतरितांच्या बाबतीत स्टार्मर यांनीही कडक धोरण स्वीकारले होते. भारताशी मुक्त व्यापार केल्यानंतर, हा व्यापार विषयक करार आहे स्थलांतराशी त्याचा संबंध नाही असे त्यांनी स्पष्ट केले होते. स्थलांतर या मुद्दयावर इंग्लंडमध्ये सामाजिक व राजकीय दुफळी दिसते. इंग्लंड मधील वांशिक ताण नियंत्रित करण्यासाठी बर्नहॅम यांनी शबाना महमूद यांच्याकडील गृहखाते कायम ठेवले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची वृत्ती हुकूमशाहीची असली तरी त्यांच्याशी जुळवून घेणे बर्नहॅम यांना भाग आहे. त्याच बरोबर 'नाटो' चे सदस्य आणि इतर युरोपीय देशांशी संबंध सुरळीत ठेवण्यावरही त्यांना लक्ष द्यावे लागणार आहे. 'ब्रेक्झिट'नंतर इंग्लंडमधील राजकीय व सामाजिक वातावरण अस्थिर बनले आहे. त्यावर मात करत देशात स्थिर सरकार देण्याचे मोठे आव्हान बर्नहॅम यांच्या समोर आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

**भारतीय सभ्यता आणि लैंगिकता**-शेतीच्या प्रारंभिक शोधानंतर साडेचार ते पाच हजार वर्षांपूर्वी सुमेरियन, इजिप्शियन आणि इंडस (सिंधू) सभ्यतेचा उदय झाला. परस्पर समांतर काळात



विकसित झालेल्या या सभ्यतांमध्ये बहुविध समाजरचनेतून आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक शांतता साधली गेल्याचे पुरावे मिळतात. या स्थिर, शांत आणि प्रगतिकारक वातावरणात साहित्य, संगीत आणि चित्र-शिल्प कला मोठ्या प्रमाणावर विकसित झाली.

## २ Joke विनोद




विश्व
राज : आई मी पोहायला जाऊ का?
आई : नको, पाणी खोल आहे आणि लाटाही जास्त आहेत.
राज : पण बाबा पोहतात त्याचे काय?
आई : त्यांचा विमा उतरवलेला आहे.

## ३ Message संदेश



Kab unki palkon se izhaar hoga,
dil ke kisi kone mein
hamare liye pyar hoga,
guzar rahi hai raat unki
yaad mein,
kabhi to unko bhi hamara
intezar hoga.

## ४ Thought सुविचार




खोबरे पाहिजे असेल तर नारळ फोडलाच पाहिजे.
- जे. ग्रॅज

**संस्कृत सुभाषित**

**प्राणा: प्राणभृतामन्नं तदयुक्त्या निहन्त्यसून ।**
**विषं प्राणहरं तच्च युक्तियुक्तं रसायनम्।।**

**अर्थ:** अन्न हे सर्व प्राणीमात्रांचे जणू प्राणच ठरते पण अयोग्य अन्न सेवन केल्यास तेच विष बनून प्राणांचे हरण करते परंतु विचाराने व युक्तीवादाने अन्न ग्रहण केल्यास अयोग्य अन्नसुद्धा उपकारक रसायन ठरते.

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. प्रणी, पशू
४. अग्रलेख
९. पहारा करणारा
११. प्रचंड, तीव्र
१३. नजरफेक
१६. गालबोट
१७. मौज करणे
१८. बादशहाचा प्रधान
२०. सबब
२१. नूतन
२२. मृत्तिका, मृदा
२३. निरर्थक
२४. शृंखला
२६. कर्ण
२८. जास्तीत जास्त
२९. हाताचा तळवा
३२. दिखाऊ, वरपांगी
३४. अवघा, सगळा
३६. गार, थंड
३७. प्रत्येक ठिकाणी
३८. दूर गेलेला
३९. टक, दृष्टी
४२. दोस्त
४३. अंत:करण
४४. जाणकार
४६. तासाचे प्रमाण
४७. अथवा
४८. युवती
५०. जानकी
५१. आजार, रोग
५५. विजार
५७. परिस्थिती
५८. पंजातील बिननावाचे बोट
५९. मूळ आधार
६०. आजच्या आधीचा दिवस
६१. गोव्यातील दैवत
६२. हालचालीवरील नजर
६४. गवत, गुरांचे खाद्य
६६. बस्तान
६७. शहर, गाव
६९. स्वच्छ, चकचकीत
७१. श्रीमंत
७२. दरी
७३. बासरी
७४. उद्याच्या नंतरचा दिवस
७७. वृक्ष
७८. किरकोळ सामान
७९. जयाचा नामघोष

### उभे शब्द

१. तरूण, सैनिक
२. भार
३. रावणाच्या तोंडांची संख्या
४. संकटाच्या वेळी
५. मोदकाचे आवरण
६. नवरा
७. संकटातून निभावणे
८. मित्राचे सोंग घेतलेला शत्रू
९. गोव्याची राजधानी
१०. माती, वाळू
१२. चांगला
१४. योग्य, बरोबर
१५. चोख, निर्भेळ सोने
१७. कणा
१९. एक पाताळ
२२. आईचा भाऊ
२३. ऐनवेळी कच खाणे
२५. दुष्ट
२७. नुकतेच जन्मलेले
२८. कर देण्यास योग्य
३०. रत्न
३१. भूपती
३३. अंगातील मस्ती, जोश
३५. हिंदीतील रहस्य
४०. रम्य, मनोहर
४१. भूतकाळ
४२. दाढीच्या जोडीची
४४. जननी
४५. साप्ताहिक सुट्टीचा दिवस
४६. धातूचा धागा
४९. भारतीय चलन
५०. वेस, हद्द
५२. जनावरांचे पिल्लू
५३. पोरका
५४. ठेकेदार
५६. निकट
५७. चलनवलन
५८. अगम्य
५९. बाजीप्रभूंनी लढवलेली जागा
६२. पलीकडे
६३. समशेर
६५. रक्षाबंधनाचा धागा
६६. अटीची भाषा
६८. डोंगरी किल्ला
७०. तपश्चर्या, साधना
७३. पाण्याचा प्रवाह
७५. मातीचा कण
७६. निरुपयोगी

### आडवे उत्तर

१.जनावर ४.संपादकीय ९.पहारेकरी ११.जबरदस्त १३.नयनबाण १६.तीट १७.मजा मारणे १८.वजीर २०.कारण २१.नवा २२.माती २३.अर्थहीन २४.साखळी २६.कान २८.कमाल २९.करतल ३२.वरवर ३४.सारा ३६.शीतल ३७.जागोजाग ३८.पारखा ३९.नजर ४२.मित्र ४३.मन ४४.माहितगार ४६.ताशी ४७.वा ४८.तरूणी ५०.सीता ५१.विकार ५५.पायजामा ५७.हालहवाल ५८.अनामिका ५९.पाया ६०.काल ६१.रवळनाथ ६२.पाळत ६४.चारा ६६.जम ६७.नगर ६९.लखलखीत ७१.मालदार ७२.खिंड ७३.पावा ७४.परवा ७७.तरू ७८.सटरफटर ७९.जयजयकार

### उभे उत्तर

१.जवान २.वजन ३.दहा ४.संकटकाळी ५.पारी ६.यजमान ७.तरणे ८.अस्तनीतील निखारा ९.पणजी १०.रेती १२.बरवा १४.यथार्थ १५.बावनकशी १७.मणका १९.रसातल २२.मामा २३.अवसानघात २५.खल २७.नवजात २८.करपात्र ३०.रतन ३१.राजा ३३.रग ३५.राज ४०.रमणीय ४१.गतकाल ४२.मिशी ४४.माता ४५.रविवार ४६.तार ४९.रुपाया ५०.सीमा ५२.कालवड ५३.अनाथ ५४.मुकादम ५६.जवळ ५७.हालचाल ५८.अनाकलनीय ५९.पावनखिंड ६२.पात ६३.तलवार ६५.राखी ६६.जरतर ६८.गड ७०.तप ७३.पाट ७५.रज ७६.वाय

# प्रदेश उपाध्यक्ष पदी अजित निंबाळकर यांची निवड



**निलंगा/प्रतिनिधी:** महाराष्ट्र काँग्रेस कमिटी ओबीसी विभाग च्या महाराष्ट्र राज्याच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी अजित निंबाळकर यांची निवड करण्यात आली आहे. या सन्मानाच्या निवडी साठी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी ओबीसी नेते बारा बलुतेदार महासंघाचे जिल्हा अध्यक्ष अजित निंबाळकर यांचे नाव सूचित केले होते. त्या नुसार त्यांची प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड झाली आहे. या निवडी बद्दल सर्व स्तरातून स्वागत होत असून मायक्रो ओबीसी, ओबीसी व बारा बलुतेदार मध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण झाले आहे. खऱ्या अर्थाने सर्व सामान्याना व आती पिचडे मायक्रो ओबीसी व बारा बलुतेदारना न्याय, हक्क व सन्मान फक्त भारतीय राष्ट्रीय काँग्रेस च देऊ शकते अशी प्रतिक्रिया नव नियुक्त प्रदेश उपाध्यक्ष अजित निंबाळकर यांनी आपल्या निवडी बद्दल दिली आहे. या निवडी बद्दल प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, प्रदेश अध्यक्ष ओबीसी विभाग डॉ. यशपाल भिंगे, माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख, जिल्हा अध्यक्ष अभय साळुंके, दिशा प्रतिष्ठान चे अभिजीत देशमुख व इतर मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूलमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी:** राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर आणि क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रमांतर्गत ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूल, आलमला (ता. औसा, जि. लातूर) येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात पार पडले. दि. २२ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या सत्रात इयत्ता आठवी ते दहावीच्या २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व, डिजिटल जगातील धोके आणि सुरक्षित इंटरनेट वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

सायबर वॉरिअर योगिता जाधव आणि प्राजक्ता बोरुळे यांनी फोटो मॉर्फिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) च्या माध्यमातून फोटो तयार करण्याची प्रक्रिया, एआयचा सुरक्षित व जबाबदारीने वापर, तसेच मजबूत पासवर्ड तयार करण्याचे महत्त्व याविषयी उदाहरणांसह माहिती दिली. मोबाईलमध्ये प डाउनलोड करताना आवश्यक आणि अनावश्यक परवानग्यांची ओळख करून देत डिजिटल सुरक्षिततेबाबत महत्त्वपूर्ण सूचना करण्यात आल्या.

यावेळी ऑनलाइन फसवणूक, बनावट संकेतस्थळे, ओटीपी फसवणूक, समाजमाध्यमांचा सुरक्षित वापर आणि डिजिटल गोपनीयतेचे महत्त्व याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्न विचारले. कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती कापसे यांचे मार्गदर्शन लाभले. आयोजनासाठी सुप्रिया जाधव यांनी विशेष सहकार्य केले. विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनावे, असे आवाहन करण्यात आले.

# माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आयोजित 'संवादवारी' ज्ञानेश्वरी विशेष दालनाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

**पंढरपूर/प्रतिनिधी:** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने आयोजित 'संवादवारी' ज्ञानेश्वरी विशेष दालनाचे उदघाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या ठिकाणी आयोजित या प्रदर्शनाच्या उद्धाटनप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर, राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, विजयकुमार देशमुख, उत्तमराव जानकर, नारायणराव पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन हरीश गायकवाड आदी उपस्थित होते.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांपर्यंत शासनाच्या विविध योजना पोहोचविण्यासाठी हे विशेष दालन उभारण्यात आले आहे. 'संवादवारी' या उपक्रमातून शासन-जनता संवाद अधिक प्रभावी करण्याचा उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या उपक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६, महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण, कौशल्य विकास व गुंतवणूक, महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, नवीन शैक्षणिक धोरण २०२०, कृषी विभागाचे डिजिटल उपक्रम, जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार, महात्मा फुले जनआरोग्य योजना, कामगार कल्याण योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री पीक विमा योजना, नमो शेतकरी महासन्मान निधी, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई




आवास योजना, शबरी आवास योजना, मागेल त्याला शेततळे, लेक लाडकी योजना, पीएम यशस्वी शिष्यवृत्ती योजना, आश्रम शाळा सुविधा, हरित ऊर्जा, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र गृहनिर्माण योजना, दिव्यांग धोरण, शाश्वत जलसंपदा व्यवस्थापन व विकास, आपत्ती व्यवस्थापन, महाराष्ट्र रोजगार हमी योजना आदी योजनांबाबत आकर्षक एलईडी चित्ररथ, पथनाट्य व प्रदर्शनाद्वारे जनजागृती करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये विकसित व्हावी या दृष्टीने अभ्यासक्रमाची निर्मिती : प्र.-कुलगुरु डॉ. अशोक महाजन

**लातूर/प्रतिनिधी:** सध्याच्या वाढत्या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्ये विकसित होणे ही काळाची अत्यंत महत्त्वाची गरज आहे आणि हीच गरज ओळखून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने विविध विद्याशाखांच्या अभ्यासक्रमाची निर्मिती केली आहे असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी बुधवारी येथे बोलताना केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (छएझ-२०२०) अंतर्गत बी.कॉम. तृतीय वर्षासाठी लागू करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या वाणिज्य विभाग आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या



संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. २२ जुलै रोजी दयानंद वाणिज्य महाविद्यालयात एकदिवसीय विद्यापीठस्तरीय कार्यशाळा संपन्न झाली, यावेळी ते उदघाटक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी होते. यावेळी मंचावर वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. हरिश्चंद्र पतंगे, दयानंद शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, कार्यशाळेचे संयोजक प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, आयोजक डॉ. मनिषा आष्टेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मनिषा आष्टेकर यांनी करून कार्यशाळा आयोजनामागील भूमिका विशद केली. यावेळी बोलताना प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन म्हणाले, सर्व क्षेत्रात स्पर्धा वाढली आहे. काळानुसार शिक्षण क्षेत्रात बदल करणे गरजेचे आहे. नव्या शैक्षणिक धोरणात कौशल्य आधारित अभ्यासक्रमांना प्राधान्य दिले आहे. नांदेड विद्यापीठानेही या अभ्यासक्रमात कौशल्ये, प्रॅक्टिकल ज्ञान यावर सर्वाधिक भर दिले आहे. या अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी शिक्षकांनी पुढाकार घेण्याची गरज आहे.

उदघाटन सत्रानंतर झालेल्या पहिल्या सत्रात बोलताना अधिष्ठाता डॉ. हरिश्चंद्र पतंगे म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण याप्रमाणे अभ्यासक्रमाची निर्मिती करताना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल याला प्राधान्य देण्यात आले. यावेळी त्यांनी नवीन अभ्यासक्रमात कोणत्या विषयांना किती क्रेडिट दिले आहे, परीक्षा पद्धती कशी असेल याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विशाल वर्मा यांनी तर शेवटी आभार प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी मानले. कार्यशाळेत विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ऊर्जा क्षेत्रातील योगदानाबद्दल महावितरणचे अध्यक्ष श्री. लोकेश चंद्र यांचा राष्ट्रीय परिषदेत विशेष गौरव

**लातूर/प्रतिनिधी:** नवीकरणीय ऊर्जेचा स्वीकार, ऊर्जा कार्यक्षमता आणि दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेसाठी वीज वितरण क्षेत्रातील उत्कृष्ट नेतृत्वाबद्दल मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांचा बुधवारी (दि. २२) विशेष गौरव करण्यात आला.

नवी दिल्ली येथे आयोजित 'टाइम्स नेटवर्क सस्टेनेबिलिटी कॉन्क्लेव्ह' 'भारत २०३५: एक आत्मनिर्भर राष्ट्र' या संकल्पनेवर आधारित या कॉन्क्लेव्हमध्ये २०३५ पर्यंत भारत हरित बांधिलकी आणि शाश्वत ऊर्जेच्या बळावर आत्मनिर्भर कसा बनू शकतो यावर विचारमंथन करण्यात आले. या परिषेदत ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांची विशेष मुलाखत घेण्यात आली.

महाराष्ट्राला स्वच्छ आणि हरित ऊर्जे कडे नेण्यासाठी मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या




मार्गदर्शनाखाली विविध योजना व प्रकल्प राबवले जात आहेत. हरित ऊर्जा परिवर्तनातून सर्वांना स्वस्त व शाश्वत वीजपुरवठ्यासह वीज क्षेत्रातील आमुलाग्र सुधारणांना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी वेग दिला आहे. ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी ऊर्जा परिवर्तनासाठी रिसोर्स अॅडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. तर या आराखड्याच्या अंमलबजावणीला मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सक्रीय वेग दिला आहे.

महाराष्ट्राच्या वीज नियोजनात २०३० पर्यंत आणखी ४५ हजार मेगावॉट विजेची क्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी ३८ हजार मेगावॉट वीज ही हरित स्रोतांकडून मिळवून एकूण ऊर्जेतील नवीकरणीय ऊर्जेचा वाटा ५० टक्क्यांपेक्षा अधिक करण्याचे ध्येय आहे. त्यास अनुसरून महावितरणने स्वस्त व शाश्वत वीजपुरवठ्यासाठी अपारंपरिक ऊर्जेला प्राधान्य देत आतापर्यंत केलेल्या एकूण वीज खरेदीच्या दीर्घकालीन करारांमध्ये तब्बल ६५ टक्के हरित ऊर्जेचा समावेश केला आहे.

यासोबतच सर्व शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा देण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांतून १६ हजार मेगावॉट क्षमतेचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. सध्या ५ हजार ५०० मेगावॉटपेक्षा अधिक क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाले असून त्याद्वारे राज्यातील १५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना सध्या दिवसा वीज पुरवठा मिळत आहे. तसेच 'मागेल त्याला सौर कृषिपंप योजने'तून १० लाखांपेक्षा अधिक 'ऑफ-ग्रिड' सौर कृषी पंप कार्यान्वित करण्यात आले आहे. तर छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पांद्वारे राज्यातील ९ लाखांहून अधिक कुटुंबांच्या वीजवापराचे बिल शून्य किंवा जवळपास मोफत झाले आहे.

# मोबाईलला थोडी विश्रांती; खेळांकडे वळा!

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाचा स्तुत्य उपक्रम



**लातूर/प्रतिनिधी:** आजच्या डिजिटल युगात मोबाईलच्या अतिवापरामुळे शारीरिक हालचाली कमी होत असताना, लातूर येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाने मोबाईल सोडा, खेळांकडे वळा हा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाला विद्यार्थी आणि प्राध्यापकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, खेळांच्या माध्यमातून काही काळ का होईना मोबाईलपासून दूर राहण्याची संधी मिळत असल्याची भावना सहभागी व्यक्त करत आहेत.

महाविद्यालयात प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी कॅरम, बुद्धिबळ आणि बॅडमिंटन या खेळांची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. दररोज दुपारी २ ते ४ या वेळेत विद्यार्थी आणि प्राध्यापक खेळांचा आनंद घेत आहेत. या उपक्रमामुळे केवळ मनोरंजनच होत नाही, तर मानसिक ताण कमी होण्यास, एकाग्रता वाढण्यास आणि शारीरिक तंदुरुस्ती जपण्यासही मदत होत आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि क्रीडा विभाग प्रमुख डॉ. अशोक वाघमारे यांच्या पुढाकाराने या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. आधुनिक जीवनशैलीत खेळांचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या अभिनव उपक्रमाचे विद्यार्थी व प्राध्यापकांनी स्वागत केले असून, भविष्यातही अशा उपक्रमांचे नियमित आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त 'स्वराज्य सप्ताह' सुरू

## राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलचा विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम जागविणारा अभिनव उपक्रम

**लातूर/प्रतिनिधी :** स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच, अशी सिंहगर्जना करणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये 'स्वराज्य सप्ताह' या विशेष उपक्रमाचे उत्साहपूर्ण उद्घाटन करण्यात आले. टिळक जयंतीपासून त्यांच्या पुण्यतिथीपर्यंत चालणाऱ्या या सप्ताहात विद्यार्थ्यांसाठी विविध वैचारिक, सांस्कृतिक आणि स्पर्धात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, राष्ट्रप्रेम, स्वराज्याची प्रेरणा आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे प्राचार्य कर्नल एस. श्रीनिवासुलु यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. यावेळी विद्यार्थी संसदेचे प्रतिनिधी बन्सील पटेल, त्रिशा बाहेती, विवेक गायकवाड, कुणाल भंडारे, श्रावणी कल्लूर, आदिती थोरमोठे व श्रावणी दाडगे उपस्थित होते. तसेच रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर, उपप्राचार्या रिना नायर, अरुल



सेल्वी, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वराज्य सप्ताहानिमित्त चित्रकला स्पर्धा, एकपात्री अभिनय, भाषण स्पर्धा, लोकमान्य टिळकांनी संपादित केलेल्या केसरी आणि मराठा या वृत्तपत्रांतील निवडक अग्रलेखांचे प्रदर्शन व अभिवाचन, माहितीपट प्रदर्शन, विचारमंथन सत्र तसेच विविध सर्जनशील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळकांच्या विचारांचा आणि कार्याचा सखोल परिचय करून दिला जाणार आहे.

या सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना टिळकांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान, निर्भीड पत्रकार म्हणून त्यांची भूमिका, प्रभावी लेखक, आदर्श शिक्षक, समाजसुधारक तसेच गीतारहस्यमधून मांडलेले कर्मयोगाचे तत्त्वज्ञान यांचा परिचय होणार आहे. भारतीय संस्कृती, राष्ट्रभक्ती, स्वाभिमान, कर्तव्यनिष्ठा आणि लोकजागृतीची मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्यासाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत शाळेच्या वतीने व्यक्त करण्यात आले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८, २४५४०९

# वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश..

## अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहान यांच्या हस्ते वृक्षारोपण



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- शासकीय महिला रुग्णालयात राजर्षी शाहू बहुउद्देशीय संस्था धाराशिवच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,धाराशिवच्या सुरक्षा समितीची बैठक समितीचे अध्यक्ष तथा प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. विश्वजित गो. पवार यांच्या अध्यक्षतेखाली स्त्री रुग्णालय, धाराशिव येथे संपन्न झाली,बैठकीनंतर वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला,यावेळी शासकीय जिल्हा रुग्णालय, धाराशिवचे अधिष्ठाता (डीन) शैलेंद्र चौहान चव्हाण यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले तर उपस्थिती मान्यवर यांच्या ही हस्ते वृक्षारोपण करण्यात आले, यावेळी अधिष्ठाता डॉ शैलेंद्र चौहान,वैद्यकीय अधिक्षक डॉ तानाजी लाकाळ, डॉ.नोमाण शेख,सुरक्षा समिती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. विश्वजित गो. पवार,वैद्यकीय अधिकारी डॉ स्मिता गवळी ,सुरक्षा समितीचे सदस्य अब्दुल लतीफ,सदस्य गणेश वाघमारे,आरोग्य मित्र शेख रौफ, सदस्य बाबासाहेब जावळे, सुनिल जोगदंड,श्री हावळे,मेट्रन पल्लवी चव्हाण,रिबेका भंडारी,श्रीमती भालेराव सिस्टर, प्रविण कलबंदे,वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी तसेच राजर्षी शाहू बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती उज्वला शिंदे,सचिव रमेश पाटील,सदस्य ज्योती राजेनिंबाळकर यांच्यासह पदाधिकारी व सदस्यांनी विविध वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धन आणि हरित परिसर निर्मितीचा संदेश दिला.

या प्रसंगी सुरक्षा समितीचे सदस्य,वैद्यकीय अधिकारी, प्रशासकीय अधिकारी तसेच संबंधित विभागांचे कर्मचारी उपस्थित होते.

# इंडिया स्किल स्पर्धा २०२६-२७ मध्ये सहभागी होण्याची सुवर्णसंधी

## २३ वर्षांखालील तरुणांना कौशल्य सादर करण्याची संधी; पात्र उमेदवारांनी ऑनलाइन नोंदणीचे आवाहन

धाराशिव (जिमाका) जगातील सर्वात मोठ्या कौशल्य स्पर्धांपैकी एक असलेल्या 'इंडिया स्किल कॉम्पिटिशन २०२६-२७' मध्ये सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील तरुणांना सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.व्यावसायिक शिक्षण व कौशल्य उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणारी ही स्पर्धा ऑलिम्पिकच्या धर्तीवरील प्रतिष्ठित स्पर्धा मानली जाते.

जगभरातील २३ वर्षांखालील तरुणांना आपल्या कौशल्याचे सादरीकरण करण्याची संधी या स्पर्धेत मिळणार असून,भारत सरकारच्या नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कौन्सिलच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

स्पर्धेच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने २०२६ मध्ये ६३ क्षेत्रांशी संबंधित जिल्हा व राज्यस्तरीय कौशल्य स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे.व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,सेक्टर स्किल कौन्सिल तसेच विविध औद्योगिक आस्थापनांच्या सहकार्याने या स्पर्धा पार पडणार आहेत.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन ऑनलाइन नोंदणी करावी.जिल्हा, विभाग,राज्य आणि देशपातळीवरील स्पर्धांमधून निवड झालेल्या उमेदवारांची नावे पुढील जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येणार आहेत.

जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी वयोमर्यादा हा एकमेव निकष असून,सर्वसाधारण स्पर्धांसाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००३ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे.तर Digital Construction, Cloud Computing, Additive Manufacturing, Cyber Security, ICT Network Infrastructure, Industrial Design Technology, Industry 4.0, Information Network Cabling, Mechatronics, Optoelectronic Technology, Robot System Integration, Water Technology, Dental Prosthetics आणि Aircraft Maintenance या क्षेत्रांमध्ये सहभागी होण्यासाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००१ किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे.

जिल्हा,विभाग,राज्य आणि देशपातळीवरून प्रतिभासंपन्न व कुशल उमेदवारांची निवड करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येणाऱ्या या स्पर्धेत सर्व आयटीआय (ITI),पॉलिटेक्निक, MSME Tool Rooms, CIPETS, IIT,अभियांत्रिकी महाविद्यालये,महाराष्ट्र स्टेट स्किल युनिव्हर्सिटी,चडइतएढ, खासगी कौशल्य विद्यापीठे,ललित कला महाविद्यालये, Flower Training Institute,Institute of Jewelry Making,विविध प्रशिक्षण संस्था,कौशल्य संस्था आणि व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन सहायक आयुक्त,कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,धाराशिव यांनी केले आहे.

# २९७ कारवाया करून २,४०,३०० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२२जुलै रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २९७ कारवाया करून २,४०,३०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.


## लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708
9284321472


# तेलबिया मूल्यसाखळी भागीदारीसाठी ३० जुलैपर्यंत अर्ज करा: राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांना आवाहन

धाराशिव (जिमाका) राष्ट्रीय खाद्यतेल अभियान- तेलबिया (NMEOAOS) सन २०२६-२७ अंतर्गत सोयाबीन, भुईमूग, करडई आणि सूर्यफूल या पिकांसाठी धाराशिव जिल्ह्यात मूल्य साखळी भागीदार (Value Chain Partner-VCP) निवडण्यात येणार आहे.या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी पिकनिहाय मूल्य साखळी भागीदार म्हणून शेतकरी उत्पादक कंपन्यांची (FPC) निवड करण्यात येणार असून,पात्र शेतकरी उत्पादक कंपन्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत ३० जुलै २०२६ पर्यंत परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत,असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

या अभियानांतर्गत जिल्हा तेलबिया समितीमार्फत निवड झालेल्या मूल्य साखळी भागीदारांद्वारे शेतकरी प्रशिक्षण, प्रमाणित बियाण्यांचे वितरण, शेतकरी शेती शाळांचे आयोजन, मूल्य साखळी गटातील शेतकऱ्यांच्या माती परीक्षणाची सुविधा,कृषी मॅपरवर लाभार्थ्यांची माहिती नोंदविणे आदी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

**शेतकरी उत्पादक कंपन्या व सहकारी संस्थांसाठी पात्रता निकष**

मूल्य साखळी भागीदार म्हणून निवड होण्यासाठी संबंधित संस्था कंपनी कायदा किंवा सहकारी कायद्यांतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

संबंधित तालुक्यात किमान तीन वर्षांचा कामाचा अनुभव असावा, म्हणजेच संस्थेची नोंदणी मार्च २०२३ पूर्वीची असावी.शेतकरी उत्पादक कंपनी किंवा सहकारी संस्थेमध्ये किमान २०० सदस्य नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. सहकारी संस्थांच्या उद्दिष्टांमध्ये तेलबिया पिकांशी संबंधित कामकाजाचा स्पष्ट उल्लेख असावा.

तसेच मागील तीन वर्षांची सरासरी वार्षिक उलाढाल किमान नऊ लाख रुपयांपेक्षा अधिक असावी. शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये शेतकऱ्यांचा किमान तीन लाख रुपयांचा समभाग असणे आवश्यक आहे.कमी उत्पादकता असलेल्या तालुक्यांमध्ये कार्यरत असलेल्या कंपन्यांना प्राधान्य दिले जाणार आहे.शासनाकडून अनुदान प्राप्त शेतकरी उत्पादक कंपन्या, तसेच '१०,००० शेतकरी उत्पादक संघ (FPO)' योजनेअंतर्गत स्थापन झालेल्या कंपन्या आणि NAFED, NSCAOS आदी सार्वजनिक संस्थांकडे नोंदणीकृत तेलबिया क्षेत्रातील शेतकरी उत्पादक कंपन्यांनाही प्राधान्य देण्यात येणार आहे.

**सार्वजनिक व खासगी संस्थांसाठीही संधी**

बियाणे,खाद्यतेल व खत क्षेत्रात कार्यरत केंद्र अथवा राज्य शासनाच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांसह The Solvent Extractors Association of India (SEA), The Soybean Processors Association of India (SOPA), Mustard Producers Association of India (MOPA), Indian Vegetable Oil Producers Association (IVPA), National Seed Association of India (NSAI) आणि Federation of Seed Industry of India (FSII) या संस्थांचाही मूल्य साखळी भागीदार म्हणून विचार केला जाणार आहे.

या संस्थांची निवड गुणांकन पद्धतीच्या आधारे केली जाणार असून,त्यासाठी किमान १० कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल,मागील तीन वर्षांत कोणतीही करथकबाकी नसणे आणि बियाणे,खते व खाद्यतेल क्षेत्रात किमान पाच वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**तेलबिया उत्पादनवाढीसाठी महत्त्वाचा उपक्रम**

राज्यात तेलबिया उत्पादनास चालना देऊन खाद्यतेल उत्पादनात वाढ करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया राबविण्यात येत आहे.या माध्यमातून शेतकरी उत्पादक कंपन्या व सहकारी संस्थांना मूल्य साखळी भागीदार म्हणून संधी उपलब्ध करून देण्यात येत असून, तेलबिया पिकांचे उत्पादन वाढविण्यासह शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्याचा या योजनेचा उद्देश आहे. जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकरी उत्पादक कंपन्या,सहकारी संस्था तसेच पात्र सार्वजनिक व खासगी संस्थांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत ३० जुलै २०२६ पर्यंत आपले परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत,असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा; नियमित महाआरोग्य शिबिरांचा संकल्प : मल्हार पाटील

## वीस विभागांमध्ये तपासणी व उपचार; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, रक्तदानातूनही समाजसेवेचा संदेश



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा असून, रुग्णांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य पाहण्याइतके मोठे सुख दुसरे नाही. सर्वसामान्यांना दर्जेदार आरोग्यसेवा सहज उपलब्ध व्हावी, यासाठी नियमित महाआरोग्य शिबिरे घेण्याचा आपला संकल्प असल्याचे भाजपाचे युवा नेते मल्हार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव शहरात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. तेरणा वैद्यकीय महाविद्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व आरोग्य विभाग जिल्हा परिषद धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाआरोग्य शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पुढे बोलताना मल्हार पाटील म्हणाले, तेरणा रुग्णालयाच्या माध्यमातून रुग्णसेवेसाठी यंदा १५ ते १८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. किडनी प्रत्यारोपणाची परवानगी मिळाल्यानंतर कळंब येथील एका चिमुकल्यावर तब्बल ५६ लाख रुपयांची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. गरजू रुग्णांना आर्थिक अडचणीमुळे उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी आपले प्रामाणिकपणे प्रयत्न सातत्याने सुरू असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले

भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनीही या उपक्रमाचे कौतुक करत, तेरणा जनसेवा उपक्रमातून आतापर्यंत सुमारे दोन लाख नागरिकांवर उपचार करण्यात आल्याचे सांगितले. जनसेवा आणि रुग्णसेवेचे हे कार्य भविष्यातही अधिक व्यापक स्वरूपात सुरू राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या शिबिरात 'रक्तात आहे राष्ट्रभक्ती, शुभेच्छा देऊ रक्तदानातून' या संदेशासह 'सेवा यज्ञ महारक्तदान संकल्प' राबविण्यात आला. मल्हार पाटील आणि दत्ता कुलकर्णी यांनी स्वतः रक्तदान करून समाजापुढे आदर्श निर्माण केला. भाजपाचे मराठवाडा संयोजक नितीन काळे यांनी या उपक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील गरजू रुग्णांसाठी आवश्यक असलेला अविरत उपचार यज्ञ आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मल्हार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पुढाकारातून सुरू केला असल्याचे सांगितले.

शिबिरात औषध वितरण, आयुष, रक्त तपासणी, दंतचिकित्सा, शल्यचिकित्सा, कान-नाक-घसा, मनोविकार, नेत्ररोग, बालरोग, त्वचारोग, अस्थिरोग, स्त्रीरोग, फिजिओथेरपी, ईसीजी, आयुष्मान भारत योजनेसह सुमारे २० विभागांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी, मार्गदर्शन आणि उपचार करण्यात आले. गंभीर आजाराचे निदान झालेल्या गरजू रुग्णांवर तेरणा रुग्णालय, नेरुळ येथे मोफत उपचाराची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. यावेळी जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, नगराध्यक्षा नेहा काकडे, राहुल काकडे, सतीश दंडनाईक, नितीन काळे, अनिल काळे, संपत डोके, प्रदीप शिंदे, ड. नितीन भोसले, अक्षय ढोबळे, प्रवीण माळी, रवी मुंडे, अभय इंगळे, विलास लोंढे, सुजित साळुंके, अभिजित काकडे, आकाश तावडे, सिद्धार्थ बनसोडे, ड. खंडेराव चौरे, धनंजय पाटील, सागर दंडनाईक, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरदास, कुलदीप मिटकरी, डॉ. एस. एस. मुल्ला, डॉ. डूमणे तसेच वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चव्हाण आदी उपस्थित होते.

**महाआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; एकाच दिवशी ६,४७८ रुग्णांची तपासणी**

जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या मैदानात बुधवारी आयोजित महाआरोग्य शिबिराला जिल्हा आणि परिसरातील नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. दिवसभरात तब्बल ६,४७८ रुग्णांची तपासणी करण्यात आली, तर २२६ रुग्णांना पुढील उपचारांसाठी संदर्भित करण्यात आले. शिबिरात मेडिसिन, अस्थिरोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा, बालरोग, दंतरोग, आयुष, प्रयोगशाळा, स्त्रीरोग, फिजिओथेरपी आदी विविध विभागांद्वारे तपासणी व उपचार करण्यात आले. याशिवाय ३१५ आयुष्मान कार्ड नोंदणी, ३९ एक्स-रे आणि युवा नेते मल्हार राणाजगजितसिंह पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांच्यासह इतर नागरिकांनी रक्तदान करून दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जयंतीनिमित्त अभिवादन केले. शिबिराच्या सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदविला. व्यापक आरोग्यसेवा आणि विविध विशेष तज्ज्ञ विभागांच्या उपलब्धतेमुळे या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649